# कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस संपन्न

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचा कार्यक्रम महात्मा गांधी यांच्या शताब्दी वर्षा निमित्त वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे साजरा करण्यात आला. दि. २४ सप्टेंबर १९६९ या दिवसी राष्ट्रीय सेवा योजना स्थापन करण्यात आली होती. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी श्रमदान म्हणून महाविद्यालय परिसरातील गाजरगवत काढून गाजरगवत निर्मुलनाचा कार्यक्रम पार पाडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. राजेंद्र गाडे, यांनी आपले अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना देशात ६३ टक्के युवा वर्ग तरूण असून प्रत्येक युवकांनी कर्तव्याची भावना ठेवून एक सुजान नागरिक व्हायला पाहिजे असे प्रतिपादन केले. राष्ट्रीय सेवा म्हणून महात्मा गांधी, राष्ट्रसंत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी स्वयंस्फुर्तपणे देश सेवा केली. असीच सेवा करण्याची भावना प्रत्येकांमध्ये असणे अतिशय आवश्यक आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कर्तव्याची जाण ठेवून जबाबदारीने वागले पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थीनी कु. सोनाली शिरस्कर हिने केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत शिंगोटे, समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले.

या वेळी महाविद्यालयाचे प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, डॉ. रविंद्र सातभाई, मंगेश शेटे, सहाय्यक कुलसचिव, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, पंकज जैन, एकनाथ भंकाळे, दिपाली शिंदे, निळकंठ मानकर, शुभम धार्मिक, रेखा ठाकरे, यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.




वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,
यवतमाळ
स्वच्छता ही सेवा
राष्ट्रीय सेवा योजना